# महाराष्ट्र राज्य
## सर्वसाधारण माहिती

१) महाराष्ट्र राज्याची व्याप्ती ३,०७,७८४ चौ.कि.मी. इतकी आहे. राज्यात एकूण ३५ महसूल जिल्हे, ३५३ तालुके, ३७८ शहरे आणि ४३,७११ खेडेगावांचा (वस्ती असलेली / वस्ती नसलेली) समावेश आहे. तसेच एक लाखाहून अधिक लोकसंख्या असणा-या शहरांची / गावांची संख्या ४० आहे.

२) २००१ च्या जनगणने आधारे महाराष्ट्र राज्याची सन २०१० ची अंदाजित लोकसंख्या १२,२८,७८,४९५ आहे. त्यापैकी पुरूषांची संख्या ६,४५,८६,११८ असून स्त्रियांची संख्या ५,८२,९२,३७७ आहे. शहरी लोकसंख्या ५,५५,६६,३१० (४५.२२%) असून ग्रामीण लोकसंख्या ६,७३,१२,१८५ (५४.७८%) आहे. लोकसंख्येची घनता (प्रति चौ.कि.मी.) ३९९ आहे. साक्षरतेचे प्रमाण (२००१ च्या जनगणनेनुसार) ७६.९% होते.

३) महाराष्ट्र राज्यात एकूण ३४,०१० नोंदणी झालेले चालू कारखाने असून त्यांत १४.९९ लाख इतके कामगार दैनंदिन कार्यरत आहेत (सन २००९ प्रमाणे). मुंबई, ठाणे, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, रायगड या जिल्हयात औद्योगिकरणाचे प्रमाण जास्त आहे.

४) राज्याची समुद्र किनारपट्टी ७२० कि.मी. इतकी आहे. लोहमार्गाची लांबी ५,९८३ कि. मी. आहे आणि रस्त्यांची लांबी (दि.३१-०३-२०१० अखेर) २,४०,०४० कि.मी. आहे.

५) सन २०१०-२०११ च्या राज्य अर्थसंकल्पात एकूण रु. १२९४९९.८८ कोटींची तरतूद आहे. त्या पैकी पोलीस विभागासाठी एकूण रु.६२२४.७८ कोटी रुपयांची (४.८१ %) तरतूद करण्यात आली आहे.

### महाराष्ट्र राज्य पोलीस -एक दृष्टिक्षेप

१) महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचे प्रमुख हे पोलीस महासंचालक आहेत. पोलीस प्रशासनाच्या दृष्टीने राज्यात एकूण ९ पोलीस आयुक्तालये व ३३ पोलीस जिल्हे असून त्या जिल्ह्यांची विभागणी ८ परिक्षेत्रांमध्ये करण्यात आलेली आहे. यामध्ये नव्याने निर्माण झालेल्या गडचिरोली परिक्षेत्राचा समावेश असून त्याचे प्रमुख पोलीस उप महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी आहेत. गडचिरोली वगळता प्रत्येक परिक्षेत्राचे प्रमुख म्हणून विशेष पोलीस महानिरीक्षक दर्जाचे अधिकारी आहेत. याशिवाय लोहमार्ग पोलीस परिक्षेत्राचा स्वतंत्र विभाग करण्यात आलेला असून त्याचे प्रमुख अपर पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी आहेत. त्यात पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई (विशेष पोलीस महानिरीक्षक), पोलीस अधीक्षक लोहमार्ग पुणे व नागपूर असे २ रेल्वे पोलीस जिल्हे, हे ३ घटक अपर पोलीस महासंचालक लोहमार्ग, परिक्षेत्र यांच्या नियंत्रणाखाली आहेत.

२) आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग हे अपर पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी असून त्यांचे मदतीसाठी सह आयुक्त ( वि.पो.म.नि. ) व राज्य मुख्यालयात प्रशासन, राजकीय, कामगार, जातीय दंगली, सुरक्षा / नक्षलवाद इत्यादी विषय हाताळण्याकरिता १० उपायुक्त आहेत. तसेच राज्यातील गुप्तवार्ता संकलनासाठी ९ घटक कार्यालये पुणे, कोल्हापूर, कोकण भवन, नागपूर, औरंगाबाद, अमरावती, नांदेड, नाशिक आणि ठाणे असे कार्यरत आहेत.

# Maharashtra State
## General Information

1) The State of Maharashtra covers an area of 3,07,784 sq. km. It comprises 35 Revenue Districts, 353 Tahsils, 378 towns and 43,711 villages (Inhabited and uninhabited). Number of cities/ urban agglomerations having population of more than 1 lakh are 40.

2) Based on 2001 census, the total estimated population of Maharashtra State during 2010 is 12,28,78,495 out of which 6,45,86,118 are Males and 5,82,92,377 are Females. The Urban population is 5,55,66,310 (45.22%), while the Rural population is 6,73,12,185 (54.78%). The density of population per sq. m. is 399. The percentage of literacy (As per 2001 census) is 76.9%.

3) There are 34,010 Regd. working factories in the State and the average daily work force is 14.99 lakh (As of 2009). The following districts have large industrial areas viz. Mumbai, Thane, Pune, Nasik, Aurangabad, Nagpur, Chandrapur, Bhandara and Raigad.

4) The State's coastline admeasures 720 kms, Railway lines network measures 5,983 kms. and the roadways network is 2,40,040 kms. (as on 31st Mar. 2010).

5) The total budget outlay of the State for the year 2010–2011 was Rs. 129499.88 crores. The share of the Police Department was Rs. 6224.78 crores (4.81 %).

### Maharashtra State Police – At a glance

1) The Maharashtra Police force is headed by a Director General of Police. There are 9 Police Commissionerates and 33 Police Districts, which are divided into 8 Ranges. Newly created Gadchiroly Range has also been included and headed by DIGP and other every Range is headed by a Special Inspector General of Police. Besides that, there is a separate Railway Police Range headed by an Addl. Director General of Police, under whom 3 units - Commissioner of Police (Railways), Mumbai, (Spl.I.G.P.) and Ss.P. Pune and Nagpur. (Railways) are functioning.

2) The State Intelligence Dept. (SID) of the State Police is headed by Commissioner, SID who is of the rank of Addl.D.G.P. and is assisted by Jt. Commissioner (Spl.I.G. P.) and 10 Dy. Commissioners, each dealing with different subjects such as Administration, Political, Labour, Communal, Security / Naxalism etc. There are 9 unit offices at Pune, Kolhapur, Kokan Bhavan, Nagpur, Aurangabad, Amravati, Nanded, Nasik and Thane in the State to collect the intelligence.

३) गडचिरोली, भंडारा, नांदेड, चंद्रपूर, यवतमाळ या जिल्हयांना भेडसावणाऱ्या नक्षलवाद्यांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी तसेच महाराष्ट्राच्या सिमेलगतच्या जिल्हयांना भेडसावणा-या नक्षलवाद्यांच्या कारवायांना आळा घालण्यासाठी तसेच शेजारच्या (आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश आणि छत्तीसगढ) राज्याशी समन्वय साधण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, नक्षल विरोधी अभियान यांचेवर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. त्यांचे कार्यालय नागपूर येथे असून त्यांचे नियंत्रणाखाली विशेष पोलीस महानिरीक्षक व पोलीस अधीक्षक , नक्षल विरोधी अभियान, नक्षलवादी विरोधी पथके कार्यरत आहेत. वि.पो.म.नि. फोर्स - १ मुंबई याचे नियंत्रणाखाली २ पोलीस अधीक्षक आहेत. तसेच २ पोलीस उप महानिरीक्षक दहशतवादी विरोधी पथक यांची नवनिर्मीत पदे असून त्यांचे नियंत्रणाखाली २ पोलीस अधीक्षक व १ पोलीस उप आयुक्त आहे. वरील सर्व पथके अपर पोलीस महासंचालक विशेष कारवाई पथक यांचे नियंत्रणाखाली आहेत.

3) The responsibility to deal with Naxalite activities, mainly in the districts of Gadchiroli, Bhandara, Nanded, Chandrapur, Yavatmal, to co-ordinate Anti Naxalite Operations in the bordering districts of the State and to co-ordinate with the neighbouring States (Andhra Pradesh, Madhya Pardesh and Chhattisgad) is entrusted to Addl.DGP., Anti-Naxalite Operations. His office is situated at Nagpur. He is assisted by Spl.IGP & SP (ANO). There is also 1 post of Spl.I.G. P. force - I Mumbai & 2 SPs. There are 2 DIGs posts newly created for ATS I & II. DIG ATS - I is for Mumbai & assisted by 2 SPs. DIG ATS - II is for Pune & assisted by 1 DCP. Above all units are under Addl.DGP. Spl. Operations

४) गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे या विभागाच्या प्रमुखपदी अपर पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी असून त्यांचे मुख्यालय पुणे येथे आहे. त्यांचे मदतीस विशेष पोलीस महानिरीक्षक (राज्य गुन्हे अभिलेख केंद्र), विशेष पोलीस महानिरीक्षक (गुन्हे-पश्चिम) व विशेष पोलीस महानिरीक्षक (गुन्हे पूर्व) हे काम पाहतात. याशिवाय प्रादेशिक स्तरावर ७ पोलीस अधीक्षक, पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, अमरावती, कोल्हापूर, कोकण भवन नवी मुंबई या विभागांचे काम पहात असून त्यांचे मुख्यालय त्या-त्या जिल्हयांच्या ठिकाणी आहे. तसेच आर्थिक गुन्ह्यांच्या तपासासाठी पोलीस उप महानिरीक्षक व पोलीस अधीक्षक (एक पद) यांची नेमणूक केली आहे. विशेष पोलीस महानिरीक्षक, (रा.गु.अ.के.) यांचे नियंत्रणाखाली पोलीस अधीक्षक, (कायदा व संशोधन), पोलीस अधीक्षक, सायबर सेल, संचालक, अंगुलीमुद्रा केंद्र, मुख्य शासकीय दस्तऐवज परिक्षक व अपर पोलीस अधीक्षक, श्वान प्रशिक्षण केंद्र हे आहेत.

4) The State CID,M.S.Pune is headed by an Addl. Director General of Police with his Head Quarters at Pune. He is assisted by the Spl. Inspector General of Police, (State Crime Records Bureau), Spl. Inspector General of Police (Crime - West) and Spl. Inspector General of Police (Crime - East). There are 7 Regional Supdts. of Police stations at Pune, Aurangabad, Nagpur, Nasik, Amravati, Kolhapur & Navi Mumbai. DIGP and one posts of Supdt. of police for Economic offences. Supdt.of Police, (Law and Research), Supdt. of Police (Cyber Cell), Director Finger Print Bureau and Chief Examiner of Documents are under Spl.I.G.P.(SCRB).

५) राज्यात एकूण १३ राज्य राखीव पोलीस दले असून त्यांची विभागणी २ परिक्षेत्रात अनुक्रमे पुणे व नागपूर अशी करण्यात आलेली आहे. त्यांचेवर विशेष पोलीस महानिरीक्षक यांचे नियंत्रण आहे. संपूर्ण राज्य राखीव पोलीस दलावर अपर पोलीस महासंचालक रा.रा.पो. बल मुंबई, यांचे नियंत्रण आहे.

5) There are 13 State Reserve Police Force Groups in the State divided into 2 Ranges headed by Dy. Inspector General of Police having Head Quarters at Pune and Nagpur, respectively. The S.R.P.F. is headed by Addl. Director General of Police stationed at Mumbai.

६) महाराष्ट्र राज्य पोलीस मोटार परिवहन विभागाचे प्रमुख विशेष पोलीस महानिरीक्षक, पुणे हे असून त्यांचे अधिपत्याखाली पोलीस अधीक्षक, मोटार परिवहन विभाग, पुणे, नागपूर व पोलीस उपआयुक्त, मोटार परिवहन, मुंबई हे आहेत. या विभागात एकूण १५,३४४ पोलीस वाहने उपलब्ध असून ती खालीलप्रमाणे आहेत (मुंबई शहरासह).

| | | |
|---|---|---|
| जडवाहने | - | ११९४ |
| हलकी वाहने | - | १४७८ |
| जीप | - | ४७५१ |
| मोटार कार | - | ६२२ |
| मोटार सायकल | - | ७२९९ |

6) Motor Transport Section of Maharashtra Police is headed by Dy. Inspector General of Police, Motor Transport, Pune. He is assisted by the Supdt. of Police, Motor Transport, Pune & Nagpur. There are 15,344 vehicles in police department in the following categories (Including Mumbai (C).

| | | |
|---|---|---|
| Heavy vehicles | - | 1194 |
| Light vehicles | - | 1478 |
| Jeeps | - | 4751 |
| Cars | - | 622 |
| Motor Cycles | - | 7299 |

७) पोलीस बिनतारी संदेश महाराष्ट्र राज्य, या विभागाचे संचालक हे अपर पोलीस महासंचालक या दर्जाचे अधिकारी असून त्यांचे मुख्यालय, पुणे येथे आहे. त्यांचे अधिपत्याखाली एक पोलीस उप - महानिरीक्षक, पोलीस अधीक्षक, मुख्यालय तीन विभागीय पोलीस अधिक्षकांपैकी पुणे / नागपूर येथे प्रत्येकी एक पोलीस अधीक्षक व मुंबई येथे पोलीस उप आयुक्त या दर्जाचे अधिकारी कार्यरत आहेत. राज्यातील प्रत्येक पोलीस स्थानकास एक जीप देण्यात आलेली असून त्यावर एक बिनतारी संच गस्तीपथकांसाठी बसविण्यात आलेला आहे. गस्ती पथके प्रत्येक लहान व मोठया शहरामध्ये कार्यरत आहेत व त्यांवर सुध्दा बिनतारी संच बसविण्यात आलेले आहेत. तसेच संपर्कासाठी सर्व पोलीस स्थानकांस बिनतारी संच बसविण्यात आलेले पाठविण्यासाठी मुंबई ते सर्व आयुक्तालये / जिल्हे हे डाटा मेसेजिंग सारख्या अत्याधुनिक व जलद यंत्रणेव्दारे जोडण्यात आलेले असून ते व्यवस्थित कार्यरत आहेत.

7) The Directorate of Police Wireless, Maharashtra State is headed by an officer of the rank of Addl. Director General of Police with his Head Quarters at Pune. He is assisted by Dy. I. G. of Police, Supdt. of Police, HQs. and three Zonal Supdt. Of Police each one at Pune, Nagpur as S.P. and at Mumbai as Dy. Commr. of Police. Wireless mobile patrolling is available in all major cities / towns. Over and above this, wireless communication has been provided to all the Police Stations as well as to all mobiles provided to Police Stns. Police Wireless Network has also started using VSAT technology to facilitate better and faster communication among senior police officers all over the state. Presently all wireless messages from Mumbai to all Commissionerates / Districts are passed through Data Messaging System.

८) राज्यात एकूण १४ पोलीस प्रशिक्षण केंद्र असून त्या पैकी महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक ही संचालक तथा अपर पोलीस महासंचालक यांच्या नियंत्रणाखाली आहे. तेथे पोलीस उप-अधीक्षक व पोलीस उप-निरीक्षक दर्जाच्या अधिका-यांना प्रशिक्षण दिले जाते. या संस्थेच्या आवारात उप संचालक यांच्या नेंतृत्वाखाली गुन्हे प्रकटीकरण प्रशिक्षण केंद्र असून तेथे प्रामुख्याने गुन्हे उघडकीस आणणेबाबत व तपासाबाबत पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना विशेष प्रशिक्षण दिले जाते. विशेष सुरक्षा प्रशिक्षण शाळा, पुणे येथे महत्वाच्या व्यक्तीचे संरक्षण करण्याकरिता पोलीस दलातील पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित केले जाते. नव्याने भरती झालेल्या पोलीस शिपायांच्या प्रशिक्षणासाठी राज्यात एकूण १० प्रशिक्षण केंद्र, मरोळ, खंडाळा, नानविज, जालना, सोलापूर, अकोला, नागपूर, बाभूळगाव (लातूर) धुळे आणि तासगांव येथे आहेत. अतिरेकी / दहशतवादी यांना प्रतिबंध करण्याचे विशेष प्रकारचे प्रशिक्षण पोलीसांना अपारंपारिक अभियान प्रशिक्षण केंद्र नागपूर येथे दिले जाते.

९) महाराष्ट्र राज्य, लाचलुचपत विभागाचे प्रमुख पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी असून त्यांचे मुख्यालय मुंबई येथे आहे. त्यांच्या मदतीस दोन अपर पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी आहेत. अॅन्टीकरप्शन ब्युरो, बृहन मुंबई या परिक्षेत्राचे अपर पोलीस आयुक्त तर अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे, नागपूर, अमरावती, औरंगाबाद, नांदेड, नाशिक व ठाणे परिक्षेत्राचे प्रमुख उपआयुक्त / पो. अधीक्षक, दर्जाचे अधिकारी असून त्यांची विभागीय कार्यालये त्या त्या ठिकाणी आहेत.

१०) राज्यातील महामार्गावरील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी, अपघातग्रस्तांना मदतीकरिता आणि वाहतुकीच्या सुरक्षे करिता महामार्ग सुरक्षा पथके कार्यान्वित आहेत. महामार्ग सुरक्षा पथकांचे प्रमुख पोलीस अधीक्षक दर्जाचे अधिकारी असून, त्यांची कार्यालये पुणे, नागपूर, औरंगाबाद व ठाणे येथे आहेत. त्यांचेवर अपर पोलीस महासंचालक, वाहतूक म.रा. मुंबई यांचे नियंत्रण आहे.

११) राज्यात महाराष्ट्र पोलीस निवास व कल्याण महामंडळ असून त्यांचे प्रमुख पोलीस महासंचालक दर्जाचे अधिकारी व्यवस्थापकीय संचालक म्हणून कार्यरत आहेत. या विभागाकडून पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी गृहबांधणी प्रकल्प राबविण्यात येतात.

१२) पोलीस सेवेत प्रवेश पुढील प्रमाणे मिळविता येतो. संघ लोकसेवा आयोगातर्फे भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी सरळ सेवेने भरती होतात. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे सरळ सेवा भरतीने पोलीस उप-अधीक्षक व पोलीस उप-निरीक्षक दर्जाच्या अधिका-यांची नेमणूक करण्यात येते. याच आयोगातर्फे पोलीस उप-निरीक्षक या पदाच्या (एकूण पदांच्या ५० टक्के) निवडीची परीक्षाही घेण्यात येते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे पोलीस उप-निरीक्षक या पदाच्या खात्यांतर्गत पदोन्नतीसाठीही परीक्षा घेण्यात येते व ही परीक्षा पास होणा-या पोलीस शिपाई यास पोलीस उप-निरीक्षक या पदावर पदोन्नती देण्यात येते. पोलीस शिपाई या पदाच्या भरतीसाठी कमीत कमी शैक्षणिक पात्रता ही १२ वी (उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा) उत्तीर्ण अशी ठरविण्यात आली आहे. परंतू नक्षलग्रस्त भागात पुरेसे उमेदवार मिळत नसतील तर १० वी पास (माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा) उत्तीर्ण झालेले उमेदवार देखील घेता येतात.

8) There are 14 Police Training Centers in the State. Maharashtra Police Academy at Nasik is headed by a Director (Addl. D.G.P.). In this Academy training is imparted to the officers of levels of the Dy. Ss.P. and P.S.Is. In the same premises there is a Detective Training School which imparts specialised training in crime detection and investigation to the officers and men. Spl. Security Training School in Pune imparts training to the Police officers and men in V.I.P. Security. There are 10 Regional Police Training Schools at Marol, Khandala, Nanvij, Jalna, Solapur, Akola, Nagpur, Babhulgaon (Latur) Dhule and Tasgaon in which recruited police constables are trained. The Unconventional Operations Training Centre at Nagpur imparts specialised training to officers and men to deal with extremists / terrorists.

9) The Maharashtra State Anti Corruption Bureau is headed by Director General of Police with Head Quarters at Mumbai. He is assisted by two Addl. Director General of Police. Anti Corruption Bureau, Brihan Mumbai unit, is headed by Addl. Commissioner of Police. There are 7 regional D.C.P. / Supdt. of Police and their offices are located at Pune, Nagpur, Amravati, Aurangabad, Nanded, Nasik and Thane.

10) In order to streamline vehicular traffic,assist persons involved in vehicle accidents, State Highway Safety Patrol Force has been created in Maharashtra State. This unit is headed by a officer of the rank of Addl Director General of Police, State Traffic, Mumbai and he is assisted by the officers of the rank of Supdt. of Police, located at Pune, Nagpur, A'bad and Thane.

11) There is a Maharashtra Police Housing and Welfare Corporation. A Director General of Police functions as its Managing Director. The Corporation undertakes construction of office and residential premises for officers and employees all over the state.

12) The following avenues are available for entry into the State Police. There is direct recruitment of I. P. S. Officers by U. P. S. C. The Maharashtra Public Service Commission directly recruits Dy. Ss. P. & P.S.I.s through competitive examination. The direct recruitment of Sub – Inspectors (50 % of the total strength) is also conducted by the M. P. S. C. The Commission also holds competitive examination for departmental candidates for promotion to the rank of Sub-Inspectors. Policemen can also be promoted as Sub-Inspector after passing departmental examination. The minimum educational qualification for recruitment as a police constable is 12th standard (H.S.C. pass). In Naxalite area; if HSC. Passed candidates are not available, S. S. C. passed candidates can also be considered for recruitment.

१३) पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे कल्याणासाठी १९९८ मध्ये पोलीस कल्याण निधी व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य पोलीस संजीवनी निधी ही योजना सुरू करण्यात आली आहे. संस्था नोंदणी अधिनियम आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम अन्वये संजीवनी निधी योजनेची नोंदणी करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यामध्ये परस्पर बंधुत्वाची भावना वाढविणे तसेच या योजनेतील सभासदांना व त्यांचे कुटुंबियांना गंभीर आजारासाठी अथवा त्यांचेवर उद्भवलेल्या वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितीमध्ये होणारा वैद्यकीय खर्च भागविण्यासाठी कर्ज अथवा अनुदानाद्वारे तातडीचे सहाय्य उपलब्ध करणे हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सर्व दर्जाच्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या ऐच्छिक मासिक वर्गणीतून या योजनेसाठी निधी गोळा करण्यात येतो.

13) For the welfare of officers and men in the department besides the Police Welfare Fund, there is a scheme known as a Sanjeewani Nidhi. This has been introduced during 1998 and has been registered under the Registration of Societies Act as well as the Mumbai Public Trust Act. The main objectives of the schemes are to inculcate sense of brotherhood among the officers and men and to provide financial assistance by way of loans and grants to the officers, men and members of their family in case of serious illness or medical emergencies. The fund is raised through monthly voluntary contributions from all officers and men.

१४) पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे सेवेत असताना जोखमीची कामे करावी लागतात. त्यांच्या सेवेचे विशिष्ठ स्वरूप व जोखीम विचारात घेवून महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना समूह व्यक्तिगत अपघात विमा योजना सन २००२ पासून लागू केली आहे. हा विमा दि ओरिएन्टल अॅश्युरन्स कं.लि. प्रादेशिक कार्यलय, मेफेअर टॉवर्स , पहिला मजला, पुणे मुंबई मार्ग, वाकडेवाडी, शिवाजीनगर, पुणे -४११००५ या कंपनी मार्फत उतरविण्यात आला आहे. सदर विमा योजना ही पोलीस अधिकारी व कर्मचारी हे सेवेत असताना कोणत्याही प्रकारचा रजेवर असताना सुद्धा अपघाती मुत्यू अथवा अपघाताने विशिष्ठ प्रकारचे अपंगत्व आल्यासच लागू होणार आहे.

14) Maharashtra State Police officers and employees have to perfrom risky duties. Keeping in view the risk of the work performed by these officers and employees, the Goverment of Maharashtra has initiated Accident Group Insurance Scheme with effect from 2002. This scheme is insured by The Oriental Assurance Co.Ltd., Regional office Mayfair Tower, 1st floor, Pune Mumbai Road, Wakdewadi, Shivajinager Pune - 411 005. This scheme is applicable to all police officers and employees of Mahrashtra State ( including all types of leave period ) for any accidental death or disability while in service.

१५) महाराष्ट्र राज्य पोलीस दलातील सर्व पोलीस अधिकारी / कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना आंतररूग्णालयीन औषधोपचार विनामूल्य पुरविण्यासाठी **महाराष्ट्र पोलीस कुटूंब आरोग्य योजना** दि. १९/०३/२००५ रोजी सुरू करण्यात आली आहे.

15) **The Maharashtra Police Family Health Plan** has been started from 19/03/2005 in which all the Maharashtra State Police Officers / men and their families are provided with free medical aid for indoor hospitalization.

***********